RNI No. MAHBIL /2009/40124

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग पाच

वर्ष ३, अंक २०(२)] मंगळवार, ऑगस्ट ८, २०१७/श्रावण १७, शके १९३९ [पृष्ठे २०, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ५३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ८ ऑगस्ट २०१७ रोजी पुर:स्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

L. A. BILL No. LIV OF 2017.

A BILL

TO PROVIDE FOR THE REGULATION OF CONDITIONS OF EMPLOYMENT AND OTHER CONDITIONS OF SERVICE OF WORKERS EMPLOYED IN SHOPS, RESIDENTIAL HOTELS, RESTAURANTS, EATING HOUSES, THEATRES, OTHER PLACES OF PUBLIC AMUSEMENT OR ENTERTAINMENT AND OTHER ESTABLISHMENTS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४.

दुकाने, निवासी हॉटेले, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटरे, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व इतर आस्थापना यांतील नोकरीच्या शर्तींचे आणि त्यांत नोकरीवर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांच्या इतर सेवाशर्तींचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक.

ज्याअर्थी, दुकाने, निवासी हॉटेले, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटरे, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व इतर आस्थापना यांतील नोकरीच्या शर्तींचे आणि त्यांत नोकरीवर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांच्या इतर सेवाशर्तींचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी कायदा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ति व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) कलम ७ खेरीज करून, या अधिनियमाच्या तरतुदी, ह्या दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी नोकरीवर ठेवलेल्या आस्थापनांना लागू असतील आणि कलम ७ च्या तरतुदी ह्या दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवलेल्या आस्थापनांना लागू असतील.

(४) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "मुख्य सुविधाकार" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २८ अन्वये नियुक्त केलेला मुख्य सुविधाकार, असा आहे;

(२) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी, असा आहे;

(३) "मालक" याचा अर्थ, आस्थापनेची मालकी असलेली किंवा त्या आस्थापनेच्या व्यवहारांवर अंतिम नियंत्रण असणारी व्यक्ती, असा आहे, आणि त्यात,—

(एक) व्यवसाय संस्था किंवा व्यक्तीचा संघ यांच्या बाबतीत, त्या व्यवसाय संस्थेचा भागीदार किंवा संघाचा सदस्य ;

(दोन) कंपनीच्या बाबतीत, त्या कंपनीचा संचालक ;

(तीन) केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांची मालकी किंवा नियंत्रण असलेली आस्थापना यांच्या बाबतीत, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा, यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाने अशा आस्थापनेचा व्यवहार पाहण्यासाठी नियुक्त केलेली व्यक्ती किंवा केलेल्या व्यक्ती,

यांचा अंतर्भाव होतो ;

(४) "आस्थापना" याचा अर्थ, कोणताही धंदा, उदीम, उत्पादन कार्य किंवा कोणतेही वृत्तपत्रीय किंवा मुद्रणकार्य किंवा बँकिग, विमा, रोखे व भाग (शेअर्स), दलाली किंवा उत्पन्न विनिमय यांबाबतचा व्यवसाय किंवा पेशा अथवा कोणताही धंदा, उदीम, किंवा पेशा किंवा उत्पादन कार्य यांच्याशी संबंधित, किंवा त्यांस आनुषंगिक अथवा सहाय्यभूत असे कोणतेही काम करणारी आस्थापना, असा आहे; आणि त्यामध्ये कोणत्याही वैद्यक व्यवसायीच्या (इस्पितळ, दवाखाना, चिकित्सालय, सर्व चिकित्सालय, प्रसूतिगृह आणि इतर यांसह), वास्तुशास्त्रज्ञाच्या, अभियंत्याच्या, लेखापालाच्या, कर संमंत्रकाच्या किंवा इतर कोणत्याही तांत्रिक किंवा व्यावसायिक सल्लागाराच्या आस्थापनेचा समावेश होतो ; आणि तसेच त्यामध्ये, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० याअन्वये नोंदणी केलेल्या संस्थेचा, आणि, जी धर्मादाय किंवा इतर विश्वस्तव्यवस्था- मग ती नोंदणीकृत असो वा नसो-तिच्याशी संबंधित असलेला किंवा तिच्याशी आनुषंगिक किंवा सहाय्यभूत असलेला कोणताही धंदा, उदीम किंवा व्यवसाय किंवा काम चालवीत असेल-मग ते लाभार्थ असो वा नसो-त्या विश्वस्तव्यवस्थेचाही समावेश होतो; आणि त्यामध्ये दुकान, निवासी हॉटेल, उपाहारगृह, खाद्यगृह, थिएटर किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर जागा यांचा समावेश होतो ; ज्यांना कारखाना अधिनियम, १९४८ याच्या तरतुदी लागू होत नाहीत आणि त्यामध्ये राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आस्थापना म्हणून घोषित करील अशा इतर आस्थापनेचा समावेश होतो;

१८६० चा २१.

१९४८ चा ६३.

(५) "सुविधाकार" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २८ अन्वये नियुक्त केलेला सुविधाकार, असा आहे;

१९४८ चा ६३.

(६) "कारखाना" याचा अर्थ, जी कोणतीही परिवास्तू, कारखाना अधिनियम, १९४८ च्या कलम २ च्या खंड (ड) च्या अर्थांतर्गत कारखाना आहे किंवा जी उक्त अधिनियमाच्या कलम ८५ अन्वये कारखाना असल्याचे मानण्यात येते अशी कोणतीही परिवास्तू, असा आहे ;

(७) "सुटी"याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ज्या दिवशी कर्मचाऱ्याला साप्ताहिक सुटी देण्यात येईल तो दिवस, असा आहे ;

(८) "रजा" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रकरण चार मध्ये तरतूद केलेली रजा, असा आहे ;

(९) "स्थानिक क्षेत्र" याचा अर्थ, ज्यास हा अधिनियम लागू असेल असे कोणतेही क्षेत्र किंवा अशी संयुक्त क्षेत्रे, असा आहे ;

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

(१०) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम याअन्वये घटित केलेली किंवा घटित केली असल्याचे मानण्यात आलेली बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याअन्वये घटित केलेल्या किंवा घटित केली असल्याचे मानण्यात आलेल्या महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित केलेल्या किंवा घटित केल्या असल्याचे मानण्यात आलेल्या नगर परिषदा, असा आहे आणि त्यात, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, स्थानिक प्राधिकरण म्हणून घोषित करील अशा इतर कोणत्याही संस्थेचा समावेश होतो ;

(११) "व्यवस्थापक" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ६ खालील अर्जामध्ये नमूद केलेली व्यक्ती, असा आहे;

(१२) "मालकाच्या कुटुंबाचा सदस्य" याचा अर्थ, मालकाबरोबर राहात असलेली व अशा मालकावर अवलंबून असलेली त्याची पत्नी, पती, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ, किंवा बहीण, असा आहे ;

(१३) "खुले" याचा अर्थ, कोणत्याही ग्राहकाची सेवा करण्यासाठी, किंवा आस्थापनेच्या कोणत्याही धंद्यासाठी, किंवा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या मदतीने अथवा त्याची मदत घेऊन त्या आस्थापनेचे किंवा त्या आस्थापनेशी संबंधित असलेले काम करण्यासाठी खुले, असा आहे;

(१४)"कामाचा कालावधी" याचा अर्थ, ज्या अवधीत एखादा कर्मचारी मालकाकडे काम करीत असेल तो अवधी, असा आहे;

(१५) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये विहित केलेले, असा आहे;

(१६) "विहित प्राधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी असलेला कामगार आयुक्त, असा आहे;

(१७) "आस्थापना नोंदवही" याचा अर्थ, या अधिनियमान्वये एकतर हाताने किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात आस्थापनांची नोंदणी करण्यासाठी ठेवलेली नोंदवही, असा आहे;

(१८) "नोंदणी प्रमाणपत्र" याचा अर्थ, आस्थापनेचे नोंदणी प्रमाणपत्र, असा आहे;

(१९) "निवासी हॉटेल" याचा अर्थ, राहण्यासाठी किंवा झोपण्यासाठी आलेल्या पाहुण्यांना आणि प्रवाशांना दाखल करून घेण्याकरिता वापरण्यात येणारी कोणतीही परिवास्तू, असा आहे आणि त्यामध्ये निवासी क्लबचा समावेश होतो;

(२०) "उपाहारगृह किंवा खाद्यगृह" याचा अर्थ, ज्या कोणत्याही परिवास्तूमध्ये लोकांना किंवा लोकांच्या एखाद्या वर्गास जेवण किंवा अल्पोपाहार तेथल्या तेथेच सेवन करण्यासाठी पुरविण्याचा धंदा पूर्णतः किंवा मुख्यत्वेकरून चालवण्यात येतो अशी कोणतीही परिवास्तू, असा आहे;

(२१) "दुकान" याचा अर्थ, ज्या कोणत्याही परिवास्तूत ग्राहकांना मालाची, एकतर किरकोळ किंवा घाऊक विक्री केली जाते किंवा सेवा दिली जाते अशी कोणतीही परिवास्तू, असा आहे आणि त्यामध्ये, अशा उदिमाच्या किंवा धंद्याच्या संबंधात मुख्यत्वेकरून वापरण्यात येणारे कार्यालय, भांडारकक्ष, गोदाम,

वखार किंवा कामाची जागा यांचा समावेश होतो - मग ती त्याच परिवास्तूत असो किंवा इतरत्र असो - मात्र त्यात कारखाना याचा समावेश होत नाही;

(२२) "कार्यकालयोजन" याचा अर्थ, कोणत्याही दिवशी कर्मचाऱ्यांच्या कामाचा, काम सुरू केल्यापासून ते संपेपर्यंतचा कालावधी, असा आहे;

(२३) "थिएटर" यामध्ये एखाद्या चलचित्राच्या किंवा इतर तदनुरूप उपकरणसंचाच्या सहाय्याने चित्रे किंवा इतर दृश्यचित्रे दाखवण्यासाठी किंवा नाट्यप्रयोग करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक मनोरंजनासाठी अथवा करमणुकीसाठी जी मुख्यत्वेकरून किंवा सर्वस्वी वापरण्याचे उद्देशित केलेली असेल, अशा कोणत्याही परिवास्तूचा समावेश होतो;

(२४) "वेतन" याचा अर्थ, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले वेतन, असा आहे; १९३६ चा ४.

(२५) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारच्या मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी, असा आहे;

(२६) "कर्मचारी" याचा अर्थ, कोणतेही मानवी श्रम, अकुशल, कुशल, तांत्रिक, कार्यात्मक किंवा कारकुनी काम करण्याकरिता, वेतनावर किंवा इतर मोबदल्यावर नेमलेली कोणतीही व्यक्ती (शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अंतर्गत येणारे शिकाऊ उमेदवार सोडून), - मग तिच्या नोकरीच्या अटी स्पष्ट किंवा ध्वनित असोत - असा आहे. १९६१ चा ५२.

विवक्षित आस्थापनांना व व्यक्तींना अधिनियम लागू नसणे.

३. या अधिनियमाच्या तरतुदी ह्या खालील आस्थापनांना लागू होणार नाहीत :—

(१) केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या आस्थापना;

(२) स्थानिक प्राधिकरणांच्या आस्थापना;

(३) मुंबई बंदर विश्वस्त मंडळाची आस्थापना;

(४) रेल्वे प्रशासनाची आस्थापना;

(५) भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्यालये;

(६) व्यापार आयुक्त व वाणिज्यिक अधिकारी व विदेशी सरकारचे इतर राजनैतिक प्रतिनिधी यांची कार्यालये;

(७) विमान सेवा कंपन्यांची कार्यालये;

(८) विकलांग, निराधार किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम व्यक्ती यांच्या उपचारासाठी किंवा देखभालीसाठी कार्यरत असलेल्या आस्थापना;

(९) कोणत्याही प्रकारच्या शैक्षणिक कार्यांशी संबंधित असलेल्या आस्थापना (जेथे व्यक्तींकडून व्यक्तीशः किंवा कोणत्याही संस्थांकडून खास शिक्षण वर्ग किंवा शिकवणी वर्ग चालवले जातात अशा आस्थापना वगळून, ज्यामध्ये

(क) कायद्याद्वारे स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आस्थापना, किंवा

(ख) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ अन्वये विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या आस्थापना, किंवा १९६५ चा महा. ४१.

(ग) शिक्षण संचालनालय किंवा तंत्रशिक्षण संचालनालय यांनी मान्यता दिलेल्या खाजगी माध्यमिक किंवा तंत्र माध्यमिक शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये किंवा शासनाने मान्यता दिलेले पाठ्यक्रम चालवणाऱ्या इतर तंत्र संस्था, म्हणून मान्यता दिलेल्या आस्थापना

यांचा समावेश होत नाही);

(१०) उच्च न्यायालय व इतर न्यायालयांची विधि ग्रंथालये;

(११) आस्थापनेत गोपनीय, व्यवस्थापकीय किंवा पर्यवेक्षकीय स्वरूपाचे काम करणारा कर्मचारी, ज्यांची यादी आस्थापनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि संकेतस्थळ नसल्यास, त्या आस्थापनेच्या दर्शनीय ठिकाणी प्रदर्शित करण्यात येईल आणि त्याची एक प्रत सुविधाकारास पाठविण्यात येईल;

(१२) ज्याचे काम मूळातच खंडित स्वरूपाचे असेल असा कर्मचारी;

(१३) मालकाच्या कुटुंबातील सदस्य.

इतर आस्थापनांना व कर्मचाऱ्यांना हा अधिनियम लागू करणे.

४. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, जिला हा अधिनियम किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदी त्या त्यावेळी लागू नसतील अशा कोणत्याही आस्थापनेस किंवा आस्थापनांच्या वर्गास, किंवा कोणत्याही कर्मचाऱ्यास किंवा व्यक्तीस किंवा कर्मचाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या वर्गास, जिला हा अधिनियम किंवा त्याच्या तरतुदी लागू असतील अशी आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग, किंवा असा कर्मचारी किंवा व्यक्ती किंवा अशा कर्मचाऱ्यांचा किंवा व्यक्तींचा वर्ग म्हणून घोषित करता येईल आणि त्यांना, राज्य शासनाच्या मते आवश्यक असतील अशा फेरबदलांसह किंवा अनुकूलनासह हा अधिनियम किंवा त्याच्या तरतुदी, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून लागू करता येतील.

(२) पोट-कलम (१) खाली अशी घोषणा करण्यात आल्यावर कोणतीही अशी आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग किंवा असा कर्मचारी किंवा व्यक्ती किंवा कर्मचाऱ्यांचा किंवा व्यक्तींचा वर्ग हा, जिला हा अधिनियम लागू होतो अशी आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग किंवा असा कर्मचारी किंवा व्यक्ती किंवा कर्मचाऱ्यांचा किंवा व्यक्तींचा वर्ग आहे असे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी या, अशा घोषणेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असे फेरबदल किंवा अनुकूलन यांसह, अशा आस्थापनेस किंवा आस्थापनांच्या वर्गास किंवा अशा कर्मचाऱ्यास किंवा व्यक्तीस किंवा कर्मचाऱ्यांच्या किंवा व्यक्तीच्या वर्गास लागू होतील.

या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी निलंबित करणे.

५. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे प्रवर्तन कोणत्याही सुट्यांच्या कारणास्तव किंवा कोणत्याही प्रसंगाच्या कारणास्तव त्यास योग्य वाटेल अशा कालावधीकरिता व अशा शर्तींच्या अधीनतेने निलंबित करता येईल.

प्रकरण दोन

आस्थापनांची नोंदणी

आस्थापनांची नोंदणी.

६. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून किंवा आस्थापनेने आपला धंदा सुरू केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दहा किंवा त्याहून अधिक कर्मचारी काम करीत असलेल्या प्रत्येक आस्थापनेचा मालक, संबंधित स्थानिक क्षेत्राच्या सुविधाकाराकडे नोंदणीकरिता विहित करण्यात येईल असे शुल्क आणि असे स्वयं-घोषणापत्र व स्वयं-प्रमाणित कागदपत्रे यांसह विहित नमुन्यात पुढील बाबींचा अंतर्भाव असलेला अर्ज ऑनलाईन सादर करील :—

(क) मालकाचे व व्यवस्थापक, असल्यास, त्याचे नाव;

(ख) आस्थापनेचा टपालाचा पत्ता;

(ग) आस्थापनेचे नाव, कोणतेही असल्यास;

(घ) आस्थापनेच्या धंद्याचे प्रत्यक्ष स्वरूप; आणि

(ङ) विहित करण्यात येतील असे इतर तपशील:

१९४८ चा ७९.

परंतु, यात वर नमूद केलेली कोणतीही बाब, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम याअन्वये अगोदरच वैध नोंदणी किंवा नूतनीकरण असणाऱ्या आस्थापनांना, त्यांची नोंदणी किंवा नूतनीकरण समाप्त होईपर्यंत लागू असणार नाही.

(२) कागदपत्रांसह अर्ज आणि शुल्क ऑनलाईन मिळाल्यावर, सुविधाकार, आस्थापनेची नोंदणी, विहित करण्यात येईल अशा रीतीने आस्थापनांच्या नोंदवहीत करील आणि विहित केलेल्या कालमर्यादेत, मालकास विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र कामगार ओळख क्रमांकासह (एल आय एन) ऑनलाईन देईल. सुविधाकार, विहित करण्यात येईल अशा मुदतीत अर्जाची व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या अचूकतेची पडताळणी करील. सुविधाकाराकडून जेव्हा जेव्हा नोंदणी प्रमाणपत्रांची मागणी करण्यात येईल तेव्हा तेव्हा ते सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) खाली देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र हे, दहा वर्षांच्या कमाल कालावधीस अधीन राहून, अर्जदार विनंती करील आणि अर्जात विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे अशा कालावधीसाठी विधिग्राह्य असेल. नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठीचा अर्ज, नोंदणी प्रमाणपत्र किंवा, यथास्थिति, नूतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वी तीस दिवसांहून कमी नसेल इतक्या अवधीत, ऑनलाईन सादर करण्यात येईल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल इतके शुल्क भरण्यात येईल तसेच नूतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र हे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

(४) नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठीचा अर्ज पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर परंतु नोंदणी प्रमाणपत्राच्या किंवा, यथास्थिति, नूतनीकरण केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या समाप्तीच्या दिनांकानंतर तीस दिवसांच्या आत सादर करण्यात आला असेल अशा बाबतीत अशा अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी देय असलेल्या शुल्काच्या निम्म्या रकमेइतके जादा शुल्क विलंब शुल्क म्हणून भरण्यात येईल.

(५) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींबाबत कोणतीही शंका किंवा मालक व सुविधाकार यांच्या दरम्यान मतभेद निर्माण झाल्यास, सुविधाकार ती बाब विहित प्राधिकाऱ्याकडे निर्देशित करील आणि तो प्राधिकारी त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून, अशा प्रकरणात निर्णय देईल आणि त्याने दिलेला निर्णय, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता अंतिम असेल.

दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवलेल्या आस्थापनेने द्यावयाचे सूचनापत्र.

७. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून किंवा आस्थापनेने धंदा सुरू केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दहापेक्षा कमी कर्मचारी काम करत असणाऱ्या प्रत्येक आस्थापनेचा मालक, ज्याच्या अधिकारितेत आस्थापना स्थित असेल त्या सुविधाकारास धंदा सुरू केला असल्याचे विहित नमुन्यात ऑनलाइन अर्ज करून व त्यासोबत विहित करण्यात येईल असे स्वयं-घोषणापत्र आणि स्वयं-प्रमाणित कागदपत्रे यांसह ज्यात मालकाचे, आणि व्यवस्थापकाचे नाव, धंद्याचे स्वरूप, कर्मचाऱ्यांची संख्या आणि विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असेल असे सूचनापत्र देईल. सुविधाकार, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने सूचनापत्राची पावती अशा आस्थापनेच्या मालकाला देईल. सूचनापत्राच्या पावतीच्या तपशिलाची विहित करण्यात येईल अशा रीतीने व नमुन्यात ठेवलेल्या नोंदवहीमध्ये ऑनलाईन नोंद घेण्यात येईल:

परंतु, कोणत्याही वेळी, वरील कोणत्याही आस्थापनेत नोकरीवर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ही दहा किंवा त्यापेक्षा जास्त झाल्यास, अशा आस्थापनेस या अधिनियमाच्या सर्व तरतुदी लागू होतील आणि अशा आस्थापनेच्या मालकास कलम ६ च्या तरतुदींनुसार नोंदणी करून घेणे बंधनकारक असेल:

परंतु आणखी असे की, या पोट-कलमातील कोणतीही बाब, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम याअन्वये अगोदरच वैध नोंदणी किंवा नूतनीकरण असणाऱ्या आस्थापनांना, त्यांची नोंदणी किंवा नूतनीकरण समाप्त होईपर्यंत लागू असणार नाही. १९४८ चा ७९.

(२) दहापेक्षा कमी कर्मचाऱ्यांना कामावर ठेवलेल्या अशा आस्थापनेचा मालक, धंदा बंद झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आणि रीतीने आस्थापना धंद्यासाठी बंद करण्यात आल्याचे सुविधाकारास अधिसूचित करील. सुविधाकार अशी माहिती मिळाल्यावर अशा आस्थापनेची अशा प्रयोजनांसाठी ठेवलेल्या नोंदवहीतून नोंद काढून टाकेल.

(३) जो कोणी या कलमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील तो, एक हजार रुपयांच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

नोंदणी रद्द करणे.

८. कोणत्याही वेळी, कोणत्याही आस्थापनेने चुकीचे अभिवेदन करून किंवा महत्त्वाची वस्तुस्थिती दडवून किंवा खोटी किंवा बनावट कागदपत्रे सादर करून किंवा खोटे घोषणापत्र देऊन किंवा लबाडीने नोंदणी मिळविलेली आहे व त्यामुळे ती नोंदणी रद्द करणे आवश्यक आहे असे सुविधाकारास आढळून आल्यास किंवा त्याच्या निदर्शनास आणून दिल्यास, सुविधाकार, आस्थापनेच्या मालकास आपले मत मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, नोंदणी रद्द करील आणि आस्थापनांच्या नोंदवहीतील अशा आस्थापना विहित केलेल्या रीतीने काढून टाकील.

बदलांबाबत सुविधाकारास कळविणे.

९. कलम ६ अन्वये सादर केलेल्या अर्जात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तपशिलात कोणताही बदल झाल्यानंतर, राज्य शासनाने विहित केलेल्या कालावधीत तो बदल ऑनलाईन प्रणालीद्वारे विहित नमुन्यामध्ये सुविधाकारास अधिसूचित करणे हे प्रत्येक मालकाचे कर्तव्य असेल. सुविधाकार विहित करण्यात येईल असे अर्जदाराचे

स्वयं-घोषणापत्र आणि अशी स्वयं-प्रमाणित कागदपत्रे, यांसह अशी नोटीस व विहित शुल्क मिळाल्यावर, अशा नोटीसला अनुसरून संबंधित आस्थापनांच्या नोंदवहीत असा बदल करील आणि ऑनलाईन नवीन प्रमाणपत्र देईल.

आस्थापना बंद केल्याचे सुविधाकारास कळविणे.

१०. मालक, धंदा बंद झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने आस्थापना धंद्यासाठी बंद करण्यात आल्याचे सुविधाकारास अधिसूचित करील. सुविधाकार, अशी माहिती मिळाल्यावर व ती बिनचूक असल्याविषयी त्याची खात्री पटल्यावर, आस्थापनांच्या नोंदवहीतून अशा आस्थापनेचे नाव काढून टाकील व ते नोंदणी प्रमाणपत्र रद्द करील:

परंतु, सुविधाकारास अशी माहिती मिळाली नसेल पण एखादी आस्थापना बंद झाल्याची अन्यथा त्याची खात्री झाली असेल तर, त्यास आस्थापनांच्या नोंदवहीतून अशा कोणत्याही आस्थापनेचे नाव काढून टाकता येईल व असे प्रमाणपत्र रद्द करता येईल.

प्रकरण तीन

आस्थापना उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा, कर्मचाऱ्यांचे कामाचे तास, विश्रांतीसाठी मधली सुटी, कार्यकालयोजन, अतिकालिक काम केल्याबद्दल वेतन आणि साप्ताहिक सुट्या.

आस्थापना उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा.

११. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, लोकहितास्तव, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एखाद्या क्षेत्रासाठी किंवा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी आणि निरनिराळ्या कालावधीसाठी, निरनिराळ्या प्रकारच्या आस्थापनांच्या किंवा आस्थापनांच्या वर्गाच्या किंवा वेगवेगळ्या परिवास्तू , व्यापारी संकुल किंवा मॉल यांच्या उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा निश्चित करता येतील.

आस्थापनेतील रोजचे व आठवड्याचे कामाचे तास आणि विश्रांतीसाठी मधली सुटी.

१२. या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही प्रौढ कर्मचाऱ्यास, कोणत्याही आस्थापनेत, कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक तास आणि कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक तास काम करण्यास भाग पाडता येणार नाही किंवा त्यास काम करण्याची मुभा देता येणार नाही. कोणत्याही प्रौढ कर्मचाऱ्यास अर्धा तास विश्रांतीसाठी मध्यंतर दिल्याखेरीज पाच तासापेक्षा अधिक कालावधीसाठी खंड न पडता काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही:

परंतु, तातडीच्या स्वरूपाच्या कामाच्या बाबतीत सुविधाकाराच्या पूर्वमान्यतेने कामाचे तास किंवा साप्ताहिक सुटी शिथिल करता येईल.

महिला कर्मचाऱ्यांबाबत भेदभाव करण्यास प्रतिबंध करणे.

१३. (१) कोणत्याही महिला कर्मचाऱ्याबाबत सेवाप्रवेश, प्रशिक्षण, बदली किंवा पदोन्नती अथवा वेतन या बाबतीत भेदभाव करण्यात येणार नाही.

(२) कोणत्याही महिला कर्मचाऱ्यास, कोणत्याही आस्थापनेत सकाळी ७-०० आणि रात्री ९-३० यामधील वेळेखेरीज इतर वेळी काम करण्यास भाग पाडता येणार नाही:

परंतु, महिला कर्मचाऱ्यास, तिच्या संमतीने कोणत्याही आस्थापनेमध्ये रात्री ९-३० नंतर आणि सकाळी ७-०० वाजेपर्यंत काम करण्याची मुभा देण्यात येईल, ज्यामध्ये मालक किंवा त्याचा अधिकृत प्रतिनिधी किंवा व्यवस्थापक किंवा पर्यवेक्षक यांच्याकडून महिलांची प्रतिष्ठा, मानसन्मान व सुरक्षितता यांचे पुरेसे संरक्षण, लैंगिक अत्याचारापासून संरक्षण आणि आस्थापनेपासून त्यांच्या निवासस्थानापर्यंत त्यांची ने-आण करण्याची व्यवस्था, विहित करण्यात येईल अशा रीतीने पुरवण्यात येईल.

(३) पूर्ववर्ती पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, लोकहितास्तव, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटेल अशा क्षेत्रातील किंवा क्षेत्रांमधील अशी दुकाने, आस्थापना, हॉटेले, उपाहारगृहे, निवासी हॉटेले, परमिट रूम, बार, स्पा-मसाज पार्लर्स, निवासगृहे किंवा कोणताही धंदा किंवा कोणताही उदीम किंवा व्यवसाय यामध्ये रात्री ९-३० नंतर आणि सकाळी ७-०० पूर्वी महिला कर्मचाऱ्यांना काम करण्यास प्रतिबंध करता येईल, किंवा त्याचे विनियमन करता येईल.

आस्थापनांतील कार्यकालयोजन.

१४. आस्थापनांतील कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन कोणत्याही दिवशी साडे दहा तासांपेक्षा अधिक असणार नाही आणि खंडित स्वरूपाचे काम किंवा तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन बारा तासांपेक्षा अधिक असणार नाही.

अतिकालिक काम केल्याबद्दल वेतन.

१५. कोणत्याही आस्थापनेतील कर्मचाऱ्यास दिवसाला नऊ तासापेक्षा किंवा आठवड्याला अठ्ठेचाळीस तासांपेक्षा जादा वेळ काम करण्यास भाग पाडण्यात आले तर, त्याबाबत तो अतिकालिक कामाच्या संबंधात त्याच्या नेहमीच्या वेतनाच्या दराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्यास हक्कदार असेल. एकूण अतिकालिक तास हे तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये एकशे पंचवीस तासांपेक्षा अधिक असणार नाहीत.

कर्मचाऱ्यांसाठी साप्ताहिक सुटी.

१६. (१)(क) आस्थापनेच्या एखाद्या विभागात किंवा विभागाच्या कोणत्याही भागात, मालकाच्या स्वेच्छा निर्णयानुसार एकापेक्षा अधिक पाळ्यांमध्ये काम सुरू ठेवता येईल आणि जर एकापेक्षा अधिक पाळ्यांमध्ये काम सुरू असेल तर, कर्मचाऱ्यास, मालकाच्या स्वेच्छानिर्णयानुसार कोणत्याही पाळीत नेमून दिल्याप्रमाणे काम करावे लागेल.

(ख) आस्थापना आठवड्यातील सर्व दिवस धंदा करण्यास खुल्या ठेवता येतील, मात्र तेथील प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवड्यातून चोवीस तास सलग विश्रांती मिळेल अशी साप्ताहिक सुटी देण्यात येईल.

(ग) कर्मचाऱ्यास साप्ताहिक सुटी नाकारल्यास, त्या कर्मचाऱ्यास, त्या साप्ताहिक सुटी ऐवजी दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत पूरक रजा देण्यात येईल.

(घ) कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रवर्गास, अशा पाळीमध्ये आठवड्यातील कामाचा कालावधी किंवा कामाचे तास, याबाबत सर्व कर्मचाऱ्यांना आगाऊ लेखी कळविण्यात येईल आणि ते इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा अन्यथा, सुविधाकाराकडे पाठवण्यात येईल.

(ङ) जर कर्मचाऱ्याला त्याच्या विश्रांतीच्या दिवशी कामावर बोलावल्यास, तो त्याच्या वेतनाच्या सर्वसाधारण दराच्या दुप्पट दराने त्या दिवसाचे वेतन मिळण्यास हक्कदार असेल.

(२) या कलमान्वये जो साप्ताहिक सुटीचा दिवस असेल त्या दिवशी आस्थापनेतील कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वेतनातून कोणतीही रक्कम कापून घेतली जाणार नाही. एखादा कर्मचारी रोजंदारीवर काम करत असल्यास, त्याची साप्ताहिक सुटी असेल तरी सुध्दा त्याला त्या दिवसाची रोजंदारी देण्यात येईल. जर एखाद्या कर्मचाऱ्यास उक्त्या कामाच्या दराने वेतन देण्यात येत असेल तरीही, त्या कर्मचाऱ्याच्या साप्ताहिक सुटीच्या दिवसाबद्दल, अशा सुटीच्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या सहा दिवसात जितके दिवस त्याने प्रत्यक्ष काम केले आहे तेवढ्या दिवसांबद्दलच्या त्याच्या रोजंदारीच्या त्यातील अतिकालिक कामाच्या संबंधातील कोणतीही कमाई होईल ती हिशेबात न धरता सरासरी वेतनाइतके वेतन देण्यात येईल:

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही बाब, ज्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या अखंडित सेवेचा एकूण कालावधी सहा दिवसांपेक्षा कमी आहे, अशा कर्मचाऱ्यास लागू होणार नाही.

मालकाने कर्मचाऱ्यास ओळखपत्र पुरवणे.

१७. आस्थापनेचा मालक, प्रत्येक कर्मचाऱ्यांस ओळखपत्र पुरवील, आणि सुविधाकाराने मागणी केली असता कर्मचारी ते सादर करील. अशा ओळखपत्रात पुढे दिलेला तसेच विहित करण्यात येईल असा इतर तपशील असेल :—

(क) मालकाचे नाव;

(ख) आस्थापनेचे नाव(कोणतेही असल्यास) व टपालाचा पत्ता;

(ग) कर्मचाऱ्याचे नाव आणि वय;

(घ) रुजू होण्याचा दिनांक, विभाग, कामाचे स्वरूप, पदनाम;

(ड.) मालकाची किंवा व्यवस्थापकाची स्वाक्षरी (तारखेसह);

(च) रक्तगट;

(छ) आधार क्रमांक.

प्रकरण चार

वेतनी रजा व वेतन देणे

१८. (१) प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवड्यातून एक दिवस भरपगारी साप्ताहिक सुटी देण्यात येईल. रजा.

(२) प्रत्येक कर्मचारी, प्रत्येक कॅलेंडर वर्षात वेतनासह आठ दिवस नैमित्तिक रजा मिळण्यास हक्कदार असेल, त्या त्रैमासिक तत्त्वावर कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा करण्यात येतील, परंतु त्याचा लाभ न घेतल्यास वर्षाअखेरीस त्या व्यपगत होतील.

(३) ज्याने, एका कॅलेंडर वर्षामध्ये आस्थापनेत, दोनशे चाळीस दिवस किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी काम केले आहे, अशा प्रत्येक कर्मचाऱ्यास नंतरच्या कॅलेंडर वर्षामध्ये, मागील कॅलेंडर वर्षामध्ये त्याने पूर्ण केलेल्या कामाच्या प्रत्येक वीस दिवसांसाठी एक दिवस या दराने परिगणना केलेल्या दिवसांच्या संख्येएवढी वेतनासह रजा घेण्याची मुभा असेल.

(४) खंड (३) मधील तरतुदीस अधीन राहून, जो कोणत्याही वर्षात तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी कामावर ठेवलेला असेल, अशा प्रत्येक कर्मचाऱ्यास वर्षातील त्याने काम केले आहे अशा प्रत्येक साठ दिवसांकरिता, पाच दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी, लागोपाठ किंवा अन्यथा, रजा घेण्याची मुभा असेल.

(५) प्रत्येक कर्मचाऱ्यास, जास्तीत जास्त पंचेचाळीस दिवसांपर्यंत अर्जित रजा साठविण्याची अनुमती देण्यात येईल.

(६) रजेसाठी पंधरा दिवस अगोदर अर्ज करूनही पोट-कलम (३) अन्वये देय रजा, मालकाकडून नाकारण्यात आली असेल तर, त्या कर्मचाऱ्यास पंचेचाळीस दिवसांच्या वरील अधिक रजेचे रोखीकरण करण्याचा हक्क असेल:

परंतु, या कलमान्वये नैमित्तिक रजा आणि सणांच्या रजा याखेरीज इतर रजा मिळण्याचा हक्क असलेल्या कर्मचाऱ्यास रजा देण्यापूर्वी, मालकाकडून नोकरीवरुन काढून टाकण्यात आले असेल, किंवा त्याने रजेसाठी अर्ज केला असता व ती नाकारण्यात आली असता, तो सेवानिवृत्तीमुळे नोकरी सोडून गेला, त्याने राजीनामा दिला, त्याचा मृत्यु झाला किंवा त्याला कायमचे अपंगत्व आले तर, मालक त्याला देय असलेल्या रजेच्या कालावधीसाठीचे संपूर्ण वेतन देईल.

(७) कर्मचाऱ्यास, प्रत्येक कॅलेंडर वर्षामध्ये २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट आणि २ ऑक्टोबर या चार सुट्या आणि वर्षास प्रारंभ होण्यापूर्वी धंद्याच्या स्वरूपानुसार मालक व कर्मचारी यांच्यामध्ये मान्य झालेल्या अशा इतर चार, अशा एकूण आठ भरपगारी सणाच्या सुट्या मिळण्याचा हक्क असेल. या दिवसाच्या सुटीबद्दल त्याला अशी सक्तीची सुटी ज्या महिन्यात येत असेल त्या महिन्यात त्याला, जे वेतन (अतिकालिक भत्ता सोडून) मिळत असेल त्याच्या दैनिक सरासरीइतक्या दराने वेतन देण्यात येईल :

परंतु, मालकास, कोणत्याही कर्मचाऱ्याला, अशा कामाबद्दल अशा कर्मचाऱ्यास दैनिक सरासरी वेतनाच्या दुप्पट रक्कम देण्यात येईल आणि तसेच या सक्तीच्या सुटीच्या ऐवजी इतर कोणत्याही दिवशी रजा देण्यात येईल या शर्तीस अधीन राहून, यांपैकी सर्व किंवा कोणत्याही दिवशी आस्थापनेत काम करण्यास बोलावता येईल.

(८) पोट-कलम (३) च्या प्रयोजनार्थ–

१९४६ चा २६. (क) कराराद्वारे किंवा संविदेद्वारे किंवा औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम, १९४६ अन्वये प्रमाणित केलेल्या आदर्श स्थायी आदेशांन्वये किंवा स्थायी आदेशान्वये अनुज्ञेय असल्याप्रमाणे कामबंदीचे कोणतेही दिवस;

१९६१ चा ५३. (ख) महिला कर्मचारी असल्यास, प्रसूती लाभ अधिनियम, १९६१ मध्ये यासाठी तरतूद केल्याप्रमाणे प्रसूती रजा;

(ग) ज्यावर्षी रजेचा लाभ घेतला असेल त्याच्या आधीच्या अर्जित रजा; किंवा

(घ) त्याच्या कामामध्ये आणि काम करीत असताना उद्‌भवलेल्या अपघातामुळे तात्पुरते अपंगत्व आल्याने कर्मचारी अनुपस्थित राहिला असल्यास,

हे दिवस कर्मचाऱ्याने दोनशे चाळीस किंवा अधिक दिवसांच्या कालावधीची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही आस्थापनेत काम केल्याचे कामाचे दिवस समजण्यात येतील, परंतु, या दिवसाची त्या कर्मचाऱ्यास अर्जित रजा अनुज्ञेय राहणार नाही.

(९) या कलमाखाली अनुज्ञेय असणारी रजा, सर्व रजेच्या दरम्यान येणाऱ्या सुट्या वगळून असेल, मग त्या रजेच्या कालावधीमध्ये येणाऱ्या असोत किंवा रजेच्या कालावधीच्या अखेरीला येणाऱ्या असोत.

(१०) प्रत्येक कर्मचारी ज्याला पोट-कलम (३) आणि (४) अन्वये रजा अनुज्ञेय असेल त्याला त्याने निकटपूर्वीच्या तीन महिन्यांत जितके दिवस प्रत्यक्ष काम केले असेल तितक्या दिवसांच्या त्याच्या वेतनाच्या दैनंदिन सरासरीइतक्या दराने अतिकालिक कामाच्या संबंधात त्यास जी कोणतीही कमाई होईल ती हिशोबात न धरता, त्याने अर्जित केलेल्या त्याच्या रजेच्या कालावधीबद्दल वेतन देण्यात येईल.

प्रकरण पाच

कल्याणकारी तरतुदी

कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षितता.

१९. (१) प्रत्येक मालक, स्वच्छता, दिवाबत्ती, वायुवीजन आणि आग प्रतिबंध यांसह कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षितता या संबंधात विहित करण्यात येतील अशा उपाययोजना करील.

(२) प्रत्येक मालक, आस्थापनेत नोकरीस असलेल्या कर्मचाऱ्यांचे पर्याप्त पर्यवेक्षण करण्यास आणि पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या आरोग्य व सुरक्षिततेशी संबंधित नियमांच्या अनुपालनांची सुनिश्चिती करण्यास आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यास जबाबदार असेल.

प्रथमोपचार.

२०. प्रत्येक मालक विहित करण्यात येतील अशा प्रथमोपचार सुविधांची कामाच्या जागी तरतूद करील.

पिण्याचे पाणी.

२१. प्रत्येक मालक, आस्थापनेत नोकरीस असलेल्या सर्व व्यक्तींसाठी सोईस्कर अशा उचित ठिकाणी, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा करण्याची प्रभावी व्यवस्था करील आणि तिची देखभाल करील.

शौचकूप व मुताऱ्या.

२२. मालक, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, पुरुष व महिला यांच्याकरिता पुरेशा शौचकूपांची व मुताऱ्यांची तरतूद करील आणि ती, आस्थापनेत नोकरीस असलेल्या कर्मचाऱ्यांना सहज जाता येईल अशा सोईच्या ठिकाणी असेल:

परंतु, जागेच्या अभावी किंवा अन्य कारणांमुळे, आस्थापनेत शौचकूपांची व मुताऱ्यांची तरतूद करणे शक्य नसल्यास, अनेक मालकांना मिळून शौचकूपांच्या व मुताऱ्यांच्या सामाईक सुविधेची तरतूद करता येईल.

पाळणाघराची सुविधा.

२३. ज्या आस्थापनेत पन्नास किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी नोकरीस असतील अशा प्रत्येक आस्थापनेत अशा कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी पाळणाघर म्हणून वापरण्याकरिता यथोचित अशा खोलीची किंवा खोल्यांची तरतूद करण्यात येईल आणि त्यांची देखभाल ठेवण्यात येईल:

परंतु, जर आस्थापनांच्या गटाने एक किलोमीटर त्रिज्येच्या आत एका सामाईक पाळणाघराची तरतूद करण्याचे ठरविले तर, मुख्य सुविधाकार आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, त्या सामाईक पाळणाघरास परवानगी देईल.

उपाहारगृह.

२४. राज्य शासन, ज्या आस्थापनेत, शंभरपेक्षा कमी नसतील इतके कर्मचारी नोकरीस असतील किंवा सर्वसामान्यपणे नोकरीस असतील, अशा आस्थापनेत कर्मचाऱ्यांच्या उपयोगासाठी एक उपाहारगृह चालविण्याची तरतूद करण्यास आणि ते सुस्थितीत ठेवण्यास मालकास भाग पाडेल:

परंतु, जर आस्थापनांच्या गटाने सामाईक उपाहारगृहाची तरतूद करण्याचे ठरविले असेल तर, मुख्य सुविधाकार, आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, त्या सामाईक उपाहारगृहास परवानगी देईल.

नोंदवह्या आणि अभिलेख ठेवणे.

२५. (१) प्रत्येक मालक, विहित करण्यात येतील अशा नोंदवह्या आणि अभिलेख ठेवील.

(२) तो अभिलेख इलेक्ट्रॉनिक किंवा हस्तलिखित स्वरुपात ठेवता येईलः

परंतु, सुविधाकाराने निरीक्षणाच्या वेळी, अशा अभिलेखांच्या मुद्रित प्रतीची मागणी केली तर, मालकाकडून किंवा त्याच्या प्रतिनिधीकडून यथोचितरीत्या स्वाक्षरी करून ती प्रत सादर करण्यात येईल.

(३) प्रत्येक मालक व त्याच्या गैरहजेरीत व्यवस्थापक, या अधिनियमाखाली व त्याच्या प्रयोजनांकरिता ठेवणे आवश्यक असलेल्या सर्व नोंदवह्या, अभिलेख व नोटिसा मुख्य सुविधाकाराने व सुविधाकारांनी निरीक्षण करण्यासाठी मागणी केली असता त्या सादर करील.

(४) अशा सर्व नोंदवह्या व अभिलेख, ज्या आस्थापनांशी संबंधित असतील त्या आस्थापनांच्या परिवास्तूमध्ये ठेवण्यात येतील.

वार्षिक विवरणपत्र.

२६. आस्थापनेचा मालक, वार्षिक विवरणपत्र, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात (इलेक्ट्रॉनिक नमुन्यासह) आणि अशा रीतीने, अशा प्राधिकाऱ्यास सादर करील.

प्रकरण सहा

अंमलबजावणी आणि निरीक्षण

स्थानिक प्राधिकरणांकडे अधिनियमाची अंमलबजावणी वर्ग करण्यासाठी तरतूद.

२७. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणखी कोणतीही नोटीस किंवा कारण देण्याची गरज न पडता, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा प्राधिकरणे किंवा स्थानिक प्राधिकरणांचा वर्ग हा, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे कर्तव्य पार पाडील, असे घोषित करता येईल. अशा तारखेपासून, अशा स्थानिक प्राधिकरणांच्या अधिकारितेच्या अधीन असणाऱ्या क्षेत्रांच्या बाबतीत, विहित करण्यात येईल अशा, राज्य शासनाच्या पर्यवेक्षणाच्या अधीन राहून, अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे हे, त्या स्थानिक प्राधिकरणाचे कर्तव्य असेल.

मुख्य सुविधाकाराची व सुविधाकारांची नेमणूक आणि त्यांचे अधिकार.

२८. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मुख्य सुविधाकाराची नेमणूक करता येईल, तो, या अधिनियमाखालील सुविधाकाराला जे अधिकार प्रदान केले असतील त्या अधिकारांबरोबरच संपूर्ण राज्याच्या सुविधाकाराचे अधिकार वापरील.

(२) राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल, अशी अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीची किंवा व्यक्तींची सुविधाकार म्हणून नेमणूक करता येईल आणि त्यास योग्य वाटतील इतके स्थानिक क्षेत्र नेमून देता येईल.

(३) राज्य शासनास, आस्थापनांच्या यादृच्छिक तपासणीसाठी, वेब-आधारित निरीक्षण अनुसूची तयार करण्याची तरतूद असेल, अशी योजना विहित करता येईल.

(४) सुविधाकारास, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, ज्या स्थानिक हद्दींकरिता त्यास नेमण्यात आले असेल त्या स्थानिक हद्दीच्या आत,—

(एक) या अधिनियमाच्या तरतुदींच्या प्रभावी अनुपालनासाठी मालक व कर्मचारी यांना मार्गदर्शन करता येईल व आवश्यक वाटेल अशी माहिती त्यांना उपलब्ध करून देता येईल;

(दोन) पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निरीक्षण योजनेनुसार आस्थापनांचे निरीक्षण करता येईल, आणि

(क) जी कोणतीही जागा आस्थापना म्हणून असेल किंवा तशी असल्याचे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस तो मदतनीस म्हणून घेईल आणि त्यासह सर्व वाजवी वेळी प्रवेश करता येईल;

(ख) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता परिवास्तू व विहित केलेल्या कोणत्याही नोंदवह्या, अभिलेख व नोटिसा यांची त्यास आवश्यक वाटेल अशी तपासणी करता येईल व तेथल्या तेथे किंवा अन्य प्रकारे कोणत्याही व्यक्तींकडून पुरावा घेता येईल;

(ग) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही आस्थापनेच्या परिवास्तूमध्ये आढळलेली आहे आणि जी आस्थापनेचा कर्मचारी आहे, असे मानण्यास सुविधाकाराजवळ वाजवी कारण असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीची तपासणी करता येईल;

(घ) कोणत्याही व्यक्तीस, व्यक्तींची नावे किंवा पत्त्यांच्या संबंधी, जी माहिती देणे त्याच्या अधिकारात आहे, अशी कोणतीही माहिती देण्यास भाग पाडता येईल;

(ङ) या अधिनियमाखालील अपराधांच्या संबंधात सुविधाकारास संबद्ध वाटेल त्याप्रमाणे आणि तो अपराध मालकाने केला असल्याचे सुविधाकारास सकारण वाटत असेल तर, त्यास अशी नोंदवही, वेतन अभिलेख, किंवा नोटिसा किंवा त्यांच्या भागांची झडती घेता येईल, ते ताब्यात घेता येतील, त्यांच्या प्रती घेता येतील;

(च) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे समाविष्ट न होणारे दोष किंवा दुरुपयोग राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देता येतील; आणि

(छ) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करता येईलः

परंतु, या कलमान्वये, कोणत्याही व्यक्तीस, ती स्वतः गुन्ह्यात अडकेल अशा प्रकारे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास किंवा कोणताही साक्षीपुरावा देण्यास सक्ती केली जाणार नाही.

(५) मुख्य सुविधाकार, सुविधाकाराचे सर्व अधिकार व कार्ये यांचा वापर करील, त्याखेरीज सुविधाकाराच्या कार्याचे नियंत्रण आणि पर्यवेक्षण करील, आणि त्यास स्थानिक क्षेत्राच्या अधिकारितेस अधीन राहून, सुविधाकाराचे कार्यक्षेत्र नेमून देता येईल किंवा पुन्हा अभिहस्तांकित करता येईल.

(६) पोट-कलमे (१) व (२) अन्वये नियुक्त केलेल्या मुख्य सुविधाकारास व सुविधाकारास आवश्यक असलेले कोणतेही कागदपत्र सादर करणारी किंवा आवश्यक असलेली कोणतीही माहिती देणारी कोणतीही व्यक्ती ही, भारतीय दंड संहितेच्या कलमे १७५ व १७६ च्या अर्थांतर्गत तसे करण्यास, कायदेशीररीत्या बांधील असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

(७) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, याच्या तरतुदी ह्या, जेथवर उक्त संहितेच्या कलम ९४ खाली काढलेल्या वारंटाच्या प्राधिकारान्वये घेण्यात येणाऱ्या झडतीच्या किंवा वस्तू कब्जात घेण्याच्या बाबतीत जशा लागू होतात तेथवर त्या, पोट-कलम (४) च्या खंड (दोन) च्या उपखंड (ङ) खालील झडतीच्या किंवा कब्जात घेण्याच्या बाबतीतही लागू असतील. १९७४ चा २.

(८) पोट-कलमे (१) व (२) अन्वये नेमणूक केलेला प्रत्येक मुख्य सुविधाकार व सुविधाकार हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक आहेत असे मानले जाईल. १८६० चा ४५.

प्रकरण सात

अपराध व शास्ती

या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास शास्ती.

२९. (१) जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करील, तो एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि उल्लंघन करण्याचे चालू ठेवल्यास असे उल्लंघन ज्या कालावधीकरिता चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल:

परंतु, द्रव्यदंडाची एकूण रक्कम, नोकरीवर ठेवलेल्या प्रति कर्मचाऱ्यामागे दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील कोणताही शिक्षापात्र अपराध केल्याबद्दल सिद्धापराधी ठरविण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, त्याच तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे किंवा त्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर केल्यामुळे, झालेल्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरली असेल तर ती, नंतरच्या सिद्धापराधाबद्दल तिला दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल:

परंतु, द्रव्यदंडाची एकूण रक्कम ही, नोकरीवर ठेवलेल्या प्रति कर्मचाऱ्यामागे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

ज्याच्या परिणामी अपघात होईल अशा प्रकारे या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

३०. या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, जेव्हा मालकास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन केल्याच्या परिणामी झालेल्या अपघातात कर्मचाऱ्याला गंभीर शारीरिक इजा किंवा त्याचा मृत्यू झाला असेल अशा प्रकरणी दोषी ठरविण्यात आले असेल तर, त्याला अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन लाख रुपयांहून कमी नसेल इतक्या व पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा त्या दोन्ही शिक्षा होतील.

सुविधाकारास अडथळे निर्माण करणे किंवा नोंदवही, इत्यादी पुरवण्यास नकार देणे याबाबत शास्ती.

३१. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये सुविधाकारास प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा तो वापर करीत असताना जो कोणी, बुद्धिपुरस्सर अडथळे निर्माण करील किंवा आस्थापनांच्या बाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत केलेल्या सुविधाकारास कोणतीही तपासणी, परीक्षण, चौकशी किंवा अन्वेषण करण्यासाठी कोणतीही वाजवी सुविधा देण्यास नकार देईल किंवा बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करील, त्याला अपराधसिद्धीनंतर दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या अनुषंगाने ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा इतर कागदपत्र सुविधाकाराने मागणी केल्यावर सादर करण्यास जो कोणी, बुद्धिपुरस्सर नकार देईल अथवा कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने काम करणाऱ्या सुविधाकारापुढे हजर होण्यास किंवा तपासणी करण्यास प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा प्रतिबंध केला असल्याचे मानण्यास संयुक्तिक कारण असेल असे काहीही करील, त्याला अपराधसिद्धीनंतर दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल:

परंतु, द्रव्यदंडाची एकूण रक्कम ही, नोकरीवर ठेवलेल्या प्रति कर्मचाऱ्यापोटी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

अपराधांची दखल.

३२. (१) कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची, असा अभिकथित अपराध घडल्याची माहिती सुविधाकारास मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत सुविधाकाराने त्याबद्दल तक्रार केली नसेल तर, दखल घेणार नाही:

परंतु, ज्यात सुविधाकाराने दिलेल्या लेखी आदेशाची अवज्ञा झाल्याचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबाबत, असा अभिकथित अपराध ज्या दिनांकास घडला असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, त्याची तक्रार करण्यात येईल.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

अपराध आपसात मिटविणे.

३३. (१) केवळ कारावासाच्या किंवा कारावासासह द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध वगळता, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला प्रत्येक अपराध, आरोपी व्यक्तीच्या अर्जावरून, एकतर कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, विहित केलेल्या रीतीने, अशा अपराधासाठी निश्चित केला असेल असा द्रव्यदंड भरून, राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा **राजपत्रित** अधिकाऱ्याकडून, आपसात मिटविता येईल.

(२) पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट,–

(क) जो अपराध आधी मिटविण्यात आला असेल तोच अपराध पुन्हा घडल्याच्या ;

(ख) ज्या अपराधाबद्दल पूर्वी दोषी ठरवले असेल अशा व्यक्तीकडून तसाच अपराध पुन्हा घडल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीच्या आत, त्या व्यक्तीकडून दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर घडलेल्या अपराधाला लागू होणार नाही.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेला प्रत्येक अधिकारी, राज्य शासनाचे निदेशन, नियंत्रण आणि पर्यवेक्षण यांच्या अधीन राहून, अपराध मिटविण्यासाठी अधिकारांचा वापर करील.

(४) अपराध मिटविण्यासंबंधीचा प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा पद्धतीने करण्यात येईल.

(५) कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी कोणताही अपराध आपसात मिटविण्यात आला असेल त्याबाबतीत, ज्या अपराध्याच्या बाबतीत अशाप्रकारे अपराध आपसात मिटविण्यात आला असेल अशा अपराधासंबंधात कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

(६) जेव्हा कोणताही खटला दाखल केल्यानंतर, कोणताही अपराध आपसात मिटविण्यात आला असेल त्याबाबतीत, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला अधिकारी, लेखी स्वरूपात, अशी आपसमेळ, ज्या न्यायालयात तो खटला प्रलंबित असेल अशा न्यायालयाच्या निर्दशनास आणील आणि त्या अपराधासंबंधीच्या आपसमेळीची अशी सूचना देण्यात आल्यावर ज्या व्यक्तीविरुद्धचा अपराध अशाप्रकारे आपसात मिटविण्यात आला असेल, त्या व्यक्तीला दोषारोपमुक्त करण्यात येईल.

(७) पोट-कलम (१) मध्ये, निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडून देण्यात आलेल्या आदेशाचे जी व्यक्ती अनुपालन करणार नाही अशी कोणतीही व्यक्ती, त्या अपराधासाठी तरतूद केलेल्या अशा द्रव्यदंडाव्यतिरिक्त आणखी अशा द्रव्यदंडाच्या कमाल रकमेच्या वीस टक्के इतकी रक्कम भरण्यास पात्र असेल.

(८) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा, या कलमाच्या तरतुदीअन्वये व तद्नुसार असेल त्याखेरीज आपसात मिटविता येणार नाही.

प्रकरण आठ

संकीर्ण

सूट देण्याचे अधिकार.

३४. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम ज्या कोणाला लागू होतो त्या कोणत्याही आस्थापनेस किंवा त्यांच्या वर्गास किंवा कोणत्याही मालकास किंवा कर्मचाऱ्यास किंवा व्यक्तीस किंवा मालकांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या वर्गास या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी लागू करण्यामधून त्यास योग्य वाटेल अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून कोणत्याही कालावधीकरिता सूट देता येईल.

३५. कोणत्याही आस्थापनेस लागू असलेला कोणताही इतर कायदा, करार, रुढी किंवा परिपाठ यांखाली किंवा अशा आस्थापनेचा मालक व कर्मचारी यास बंधनकारक असलेला कोणताही निवाडा, मिटवणूक किंवा करार यांखाली या आस्थापनेतील कर्मचाऱ्यास हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास जे कोणतेही अधिकार किंवा विशेषाधिकार उपभोगण्याचा हक्क असेल ते अधिकार किंवा विशेषाधिकार हे या अधिनियमाअन्वये त्यास उपभोगता येतील त्यापेक्षा अधिक फायदेशीर असतील तर, त्यास या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींमुळे बाधा येणार नाही. इतर कायद्याखाली असलेले अधिकार व विशेषाधिकार यांस बाध न येणे.

३६. या अधिनियमाखाली सदभावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही केली जाणार नाही. सदभावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

३७. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीच्या अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि तशा आशयाचा आपला निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

३८. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांकरिता, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम निरसित करणे.

३९. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्या दिनांकापासून महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ चा ७९. निरसित होईलः

परंतु,-

(क) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्या तरतुदीखाली केलेली, काढलेला किंवा दिलेला प्रत्येक नेमणूक, आदेश, नियम, उपविधि, विनियम, अधिसूचना, किंवा नोटीस ही या अधिनियमाखाली केलेली, काढलेला किंवा दिलेला कोणताही नेमणूक, आदेश, नियम, उपविधि, विनियम, अधिसूचना किंवा नोटीस याअन्वये अधिक्रमित झालेली नसेल तर व होईतोपर्यंत या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर या अधिनियमाच्या तरतुदींखाली करण्यात, काढण्यात किंवा देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(ख) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीच्या संबंधात चालू असलेली कोणतीही कार्यवाही ही जणू काही उक्त अधिनियम निरसित करण्यात आलेला नसावा परंतु तो प्रवर्तनात असण्याचे पुढे चालू असावा त्याप्रमाणे पुढे चालविण्यात व पूर्ण करण्यात येईल, आणि अशा कार्यवाहीवर जो कोणताही दंड लावण्यात येईल तो अशाप्रकारे निरसित केलेल्या अधिनियमाखाली वसूल करण्यात येईल.

उद्देश व कारणे यांचे निवेदन.

दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेले, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटरे, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व इतर आस्थापना यांतील कामाच्या व नोकरीच्या शर्तींचे विनियमन करण्याशी संबंधित असलेल्या कायद्याचे एकत्रीकरण करण्याकरिता आणि त्यात सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (१९४८ चा ७९) अधिनियमित केला आहे.

२. आधुनिक माहिती व तंत्रज्ञान यांमुळे व्यापार करण्याच्या पद्धतीत क्रांती घडून आली असून, त्यामुळे वस्तू व सेवांची ऑनलाईन विक्री करणेही कोणत्याही प्राकृतिक व भौगोलिक मर्यादांशिवाय व २४ तास उपलब्ध असल्यामुळे वेळेच्या मर्यादेशिवाय शक्य झाले आहे. म्हणून, आठवड्यातून एक दिवस दुकाने किंवा आस्थापनांचे कामकाज बंद ठेवण्याच्या व आस्थापना उघडण्याच्या व त्या बंद करण्याच्या वेळांवर निर्बंध घालण्याबाबतच्या उक्त अधिनियमातील तरतुदी ह्या, कालबाह्य झाल्या आहेत. ऑफलाइन धंद्यास ऑनलाइन धंद्याबरोबर स्पर्धा करण्यासाठी समांतर व्यासपीठाची तरतूद करणे आणि चोवीस तासांकरिता व आठवड्यातील सर्व दिवसांसाठी दुकाने व आस्थापना चालू ठेवण्याची परवानगी देणे आवश्यक ठरते. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्यास आणि स्थूल देशांतर्गत उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

३. शासनाचे "उद्योगव्यवसाय सुलभीकरण धोरण" या धर्तीवर, दहा कर्मचाऱ्यांहून कमी कर्मचारी असणाऱ्या अतिलहान व लहान आस्थापनांना अधिनियमाखालील नोंदणीतून मुक्त ठेवण्याची आणि स्वयं-घोषणापत्र व स्वयं-प्रमाणित कागदपत्रे यांवर आधारित, अधिनियमान्वये सर्व सेवा ऑनलाइन देण्याची गरज आहे.

दुकाने व आस्थापना यांतील कर्मचाऱ्यांसाठी एकरूप कामाच्या शर्ती असणेदेखील आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांना सर्व कल्याणकारी उपाययोजना लागू करण्यात यावी, जेणेकरून त्यांचे आरोग्य आणि स्वास्थ्य यात सुधारणा होऊन त्यांच्या उत्पादक क्षमतेत वाढ होईल. तसेच महिलांच्या साक्षरता टक्केवारीत वाढ झाल्यामुळे, महिला कर्मचाऱ्यांसाठी नोकऱ्या व रोजगाराचे पुष्कळ मार्ग उपलब्ध झाले आहेत. महिलांना, विशेषतः त्यांचे आरोग्य, सुरक्षितता व आदर यांसंबंधीच्या विवक्षित वाजवी अटी व शर्ती यांस अधीन राहून, पुरुष कर्मचाऱ्यांसारखे रात्रपाळीत काम करण्याची परवानगी दिल्याने त्यांच्या अर्जन क्षमतेत वाढ होईल व परिणामी त्यांचे सबलीकरण होईल.

४. केंद्र सरकारनेदेखील, सविस्तर विमर्श व विचारविनिमय केल्यानंतर ज्यास अंतिम रूप दिलेले आहे असे आदर्श दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) विधेयक, २०१६, सर्व राज्य शासनांना विचारार्थ प्रसृत केले आहे.

५. वरील बाबी लक्षात घेता, महाराष्ट्र शासनास विद्यमान महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम निरसित करून, विविध आस्थापनांतील नोकरीच्या शर्तींचे आणि त्यात नोकरीवर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर शर्तींचे विनियमन करण्यासाठी, केंद्र सरकारने प्रसृत केलेल्या आदर्श विधेयकाच्या धर्तीवर, एक नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट वाटते.

६. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **संभाजी पाटील-निलंगेकर,**
दिनांक ३ ऑगस्ट २०१७. कामगार मंत्री.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेतः

खंड१(४).- या खंडान्वये राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील, अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड२.- या खंडाखालील,—

(एक) उप-खंड (४) अन्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही इतर आस्थापनेस, आस्थापना म्हणून घोषित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(दोन) उप-खंड (१०) अन्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही प्राधिकरणास, स्थानिक प्राधिकरण म्हणून घोषित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड४.- या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्या कोणत्याही आस्थापनेस किंवा आस्थापनांच्या वर्गास किंवा ज्या कोणत्याही कामगार किंवा कामगारांच्या वर्गास उक्त अधिनियम लागू नाही त्यांना हा अधिनियम किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदी लागू असतील, असे घोषित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड५.- या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे प्रवर्तन कोणत्याही सुट्यांच्या किंवा प्रसंगाच्या, कारणास्तव अशा कालावधीसाठी आणि शर्तींना अधीन राहून निलंबित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ६.- या खंडाखालील,—

(एक) उप-खंड (१) अन्वये, आस्थापनांच्या नोंदणीसाठीच्या अर्जाचा नमुना, त्यासाठीचे शुल्क आणि अर्जासोबत सादर करावयाचे स्वयं-घोषणापत्र आणि स्वयं-प्रमाणित कागदपत्रे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(दोन) उप-खंड (२) अन्वये, आस्थापनांच्या नोंदणीची रीत, नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना आणि ज्या मुदतीत नोंदणी प्रमाणपत्र द्यावयाचे आहे ती मुदत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(तीन) उप-खंड (३) अन्वये, शुल्क व नोंदणी प्रमाणपत्रांच्या नूतनीकरणाचा नमुना विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ७.- या खंडाखालील,—

(एक) उप-खंड (१) अन्वये, आस्थापनांच्या सूचनापत्रासाठी अर्जाचा नमुना आणि त्या अर्जासोबत सादर करावयाचे स्वयं-घोषणापत्र व स्वयं-प्रमाणित कागदपत्रे आणि अशा सूचनापत्राच्या नोंदवहीचा नमुना विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(दोन) उप-खंड (२) अन्वये, मालक ज्या रीतीने आणि ज्या नमुन्यात आस्थापना बंद करण्याची सूचना सुविधाकारास अधिसुचित करील, ती रीत व तो नमुना विहित करण्याचा अधिकार,राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ९.- या खंडान्वये, नोंदणी अर्जात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तपशिलातील बदलाची सूचना आणि त्यासाठीचे शुल्क ज्या नमुन्यात व ज्या कालावधीत सुविधाकाराला अधिसूचित करावयाचे आहे, तो नमुना व कालावधी विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १०.- या खंडान्वये, मालक ज्या रीतीने व ज्या नमुन्यात आस्थापना बंद करण्याची सूचना सुविधाकाराला अधिसूचित करील, ती रीत व तो नमुना विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ११.- या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, लोकहितास्तव आस्थापना उघडण्याच्या व बंद करावयाच्या वेळा निश्चित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १३.- या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महिला कर्मचाऱ्यास आणि आस्थापना ते निवास्थानापर्यंतच्या त्यांच्या प्रवासास, पुरेसे संरक्षण विहित करण्याचा आणि रात्री ९.३० नंतर आणि सकाळी ७.०० पूर्वी महिला कर्मचाऱ्यांच्या नोकरीस प्रतिबंध किंवा तिचे नियमन करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १७.- या खंडान्वये, कर्मचाऱ्यांच्या ओळखपत्रांचे तपशील विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १९.- या खंडान्वये स्वच्छता, उजेड, वायुविजन आणि आग प्रतिबंध यांसह कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षा यांच्याशी संबंधित उपाययोजना विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २०.- या खंडान्वये, प्रत्येक मालकाने तरतूद करावयाच्या प्रथमोपचार सुविधा विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २२.- या खंडान्वये, पुरूष व महिला यांच्याकरिता पुरेसे शौचकूप व मुताऱ्या विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २५.- या खंडान्वये, मालकाने ठेवावयाच्या अशा नोंदवह्या आणि अभिलेख विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २६.- या खंडान्वये, ज्या प्राधिकरण्याकडे मालकाकडून वार्षिक विवरणपत्र सादर करण्यात येईल तो प्राधिकारी आणि ते विवरणपत्र सादर करण्याची रीत व त्याचा नमुना विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २७.- या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला अधिनियमाची अंमलबजावणी सोपवण्याचा आणि अधिनियमाच्या अंमलबजावणी संबंधात अशा स्थानिक प्राधिकरणावरील पर्यवेक्षण विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २८.- या खंडाखालील,—

(एक) उप-खंड (१) अन्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मुख्य सुविधाकाराची नेमणूक करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(दोन) उप-खंड (२) अन्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, सुविधाकाराची नेमणूक करण्याचा आणि सुविधाकार म्हणून नेमणूक करण्यासाठी व्यक्तींची अर्हता विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(तीन) उप-खंड (३) अन्वये, आस्थापनांची यादृच्छिक तपासणीची योजना विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(चार) उप-खंड (४) अन्वये, सुविधाकाराकडून वापरण्यात येणाऱ्या अधिकारांबद्दलच्या शर्ती आणि सुविधाकाराचे असे इतर अधिकार विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३३.- या खंडाखालील,—

(एक) उप-खंड (१) अन्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अपराध मिटविण्याकरिता राजपत्रित अधिकारी विनिर्दिष्ट करण्याचा,आणि तसेच अपराध मिटविण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(दोन) उप-खंड (४) अन्वये, अपराध मिटविण्याबद्दलच्या अर्जाचा नमुना, आणि तो अर्ज ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३४.- या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्यामधून, कोणतीही आस्थापना, मालक किंवा कर्मचारी किंवा त्याचा वर्ग यांना सूट देण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३७.- या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३८.- या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वरील प्रस्ताव हे, सामान्य स्वरूपाचे आहेत.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक ८ ऑगस्ट २०१७.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.